मुंबई, ठाणे, पालघर येथून प्रसिद्ध आणि रायगड, रत्नागिरी, पुणे, नाशिक येथून वितरीत

द ■ मराठी दैनिक भारतीय समाज मनाचे प्रतिबिंब

ग्लोबल टाइम्स

■ Register No. : RNI - MAHMAR /2012/44621 ■ मुंबई ■ अंक : ७३ ■ वर्ष : १२

Web Site : www.theglobaltime.com ■ मंगळवार दि. २६ मार्च २०२४ ■ पाने : ०८ ■ किंमत : ₹ ३.००

# विवेकानंद कॉलेजमध्ये २७ व २८ मार्चला विवेकानंद महोत्सवाचे आयोजन

**कोल्हापूर** : येथील विवेकानंद कॉलेजमध्ये 'विवेकानंद महोत्स्व : शोध चैतन्याचा' हा विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला वाव देणारा उपक्रम दि. २७ व २८ मार्च रोजी होत आहे. हा उपक्रम विवेकानंद कॉलेजच्यावतीने दरवर्षी आयोजित केला जातो. हा महोत्सव राष्ट्रीय स्तरावरील असून यामध्ये विविध महाविद्यालयातील पदवी व पदव्युत्तर विद्यार्थी विविध स्पर्धांमध्ये सहभागी होणार आहेत.

महोत्सवाचे उद्घाटन दि. २७ रोजी श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांच्या हस्ते सकाळी १० वाजता होणार आहे. यावेळी संस्था सेक्रेटरी प्राचार्या सौ. शुभांगी गावडे, संस्थेचे सीईओ कौस्तुभ गावडे, विवेकानंद कॉलेजचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार व विवेकानंद महोत्सवाच्या समन्वयक डॉ. श्रुती जोशी उपस्थित राहणार आहेत.

महोत्सवाच्या पहिल्या दिवशी शॉर्टफिल्म्म मेकींग, एकपात्री, अभिवाचन, इनोव्हेटीव रिसर्च आयडीयाज अशा विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. स्पर्धेतील पहिल्या तीन विजेत्यांना अनुक्रमे १००० रुपये, ७०० रुपये व ५०० रुपये रोख पारितोषिक आणि प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात येणार आहे.

महोत्सवाच्या दुसऱ्या दिवशी कॉलेजमधील विद्यार्थी, विद्यार्थिनींसाठी मिस्टर विवेकानंद आणि मिस विवेकानंद या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या दोन्ही दिवशी खवय्यांसाठी महाविद्यालयाच्यावतीने फुड फेस्टीवलचे आयोजन करण्यात आले आहे.

तरी या महोत्सवाचा लाभ सर्वांनी घ्यावा असे आवाहन कॉलेजचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार आणि विवेकानंद महोत्सवाच्या समन्वयक डॉ. श्रुती जोशी यांनी केले आहे.